MHKO070000862023

**कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अर्ज क्र. ५/२०२३**

**( सौ. स्नेहल मगदूम व इतर – वि. – श्री. अमित मगदूम )**

**<u>निशाणी ०५ वर आदेश</u>**

अर्ज वाचला. अर्जदार व गैरअर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सध्य स्थितीला तिघे अर्जदार गैरअर्जदारांसोबत ज्या सामाईक घरामध्ये राहतात त्यामधून गैरअर्जदारांनी अर्जदारांना बेदखल करु नये याकरिता प्रामुख्याने मागणी करण्यात आली आहे आणि केवळ त्या हद्दीपर्यंत मी उभय पक्षकारांच्या युक्तीवादाचा विचार करत आहे.

**०२.** कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याच्या कलम २(एस) मध्ये नमूद केल्यानुसार अर्जदार व गैरअर्जदार सध्या सामाईक घरामध्ये राहतात असे अभिलेखाचे अवलोकन करता प्रथमदर्शनी दिसते. अशापरिस्थितीत जर अर्जदारांना घराबाहेर काढले गेले तर त्यांच्यावर उपासमारीची व पर्यायाने अर्जदार क्र. १ च्या माहेरी जावून राहण्याची नामुश्की ओढावू शकते याबाबीचा विचार करता आणि प्रामुख्याने अशा स्वरुपाची कोणतीही कार्यवाही करण्याची गैरअर्जदाराची तयारी नसल्याचे त्यांच्यामार्फत युक्तीवादादरम्यान सादर करण्यात आल्याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात.

## <u>आदेश</u>

१. सदर कायद्याच्या कलम १८ अन्वये अंतरिम संरक्षण आदेश आणि कलम १९ अन्वये अंतरिम निवासी आदेश जारी करण्यात येवून गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत अर्जाच्या निकालापावेतो अर्जदारांना मौजे संभाजीपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील मालमत्ता क्र. ७५६ या सामाईक घरामध्ये बेदखल करु नये.

२. अर्जदार क्र. १ हिलादेखील असे स्पष्ट निर्देश देण्यात येतात की, सामाईक घरामध्ये राहतेवेळेस गैरअर्जदारांना उपद्रव निर्माण होईल असे कोणतेही कृत्य अथवा वक्तव्य करु नये.

३. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, संबंधीत पोलीस ठाणे आणि उभय पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

( **आनंद दे. करभाजन** )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

ठिकाण – जयसिंगपूर.
दिनांक – २१/०१/२०२३